जलसंपदा विभागांतर्गत भूसंपादन, पुनर्वसन इ. कामांकरीता महामंडळांतर्गत "भूसंपादन कक्ष" निर्माण करुन पदे उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : आढावा २०१८/प्र.क्र.१३/२०१८/आस्था.(पुनर्रचना)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०९ जुलै, २०१९

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय क्रमांकः वित्त विभाग क्र.१०९२/सीआर/८०६/व्यय-६, दिनांक १५/१०/१९९२.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०६/०१/१९९८ अन्वये प्रसिध्द केलेला महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.
३) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०४/०४/१९९६ अन्वये प्रसिध्द केलेला महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.
४) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०४/१२/१९९७ अन्वये प्रसिध्द केलेला महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.
५) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१७/०८/१९९८ अन्वये प्रसिध्द केलेला महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.
६) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२८/०४/१९९७ अन्वये प्रसिध्द केलेला महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.
७) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक: आढावा १००२/३३५/२००२/आ(प्रशि), दि.६/२/२००३.
८) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक: बीओटी-२०१८/प्र.क्र.३१९/२०१८/सिं.व्य.(महसूल), दि.१७/६/२०१९.
९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/का.१२, दि.१७/१२/२०१६.
१०) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही २०१६/प्र.क्र.५१०/का.१२, दि.१६/२/२०१८.
११) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.८/१/२०१६ व दि.१७/१२/२०१६.

<u>**प्रस्तावना**</u> :-

संदर्भाधिन अ.क्र. २ ते ६ येथील अधिनियमान्वये राज्यात कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद या पाच महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील प्रकरण ५ (भूमिसंपादन) मधील कलम २६, २७ व २८ अन्वये या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी भूमिसंपादन करण्याचे अधिकार, राज्य शासनाकडे निहित असतील अशा कोणत्याही जमिनी महामंडळाच्या स्वाधीन करणे व महामंडळाकडे निहित असलेली कोणतीही जमिन, इमारत किंवा मालमत्ता भाडेतत्वावर देणे किंवा अन्य प्रकारे निकालात काढण्याचे अधिकार महामंडळांस देण्यात आले आहेत. त्यानुसार या पाचही महामंडळांकडे मोठ्या प्रमाणात भूसंपादन प्रकरणे असून पुनर्वसनाच्या संदर्भातील बाबी देखील हाताळण्यात येतात. भूसंपादनाच्या अनुषंगाने काही वेळा न्यायालयीन प्रकरणे देखील उद्भवतात. महामंडळांकडे प्रकल्पाच्या संपादित केलेल्या जमिनीही असून त्यांची योग्य ती देखभाल होणे गरजेचे आहे. अनेकदा मनुष्यबळ किंवा विवक्षित अधिकारी नेमला नसल्याने विभागाच्या जागेवर अतिक्रमण होण्याच्या घटना उद्भवत आहेत. विभागाच्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या जमिनींची मालमत्ता पत्रक (Property Cards) देखील योग्यरित्या जतन करणे आवश्यक आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील, धरण क्षेत्रानजीकच्या अतिरिक्त जमिनी, विश्रामगृहे व रिक्त वसाहती Public Private Partnership (PPP) या तत्वावर खासगी यंत्रणाकडून विकसित करणे व व्यवस्थापन करणे यासाठीचे धोरण संदर्भाधिन क्र.८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केले असून, या सर्व कामांकरीता प्रत्येक महामंडळामध्ये उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची आवश्यकता आहे. वित्त

विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १५.१०.१९९२ मधील तरतूदीनुसार या विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील आस्थापनांची फिरवाफिरव करण्याची मुभा देण्यात आली आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन, जलसंपदा विभागांतर्गत भूसंपादन, पुनर्वसन इ. कामांकरीता महामंडळांतर्गत “भूसंपादन कक्ष” निर्माण करुन पदे उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

शासन निर्णय -:

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद या पाचही महामंडळांतर्गत भूसंपादन कक्षाची निर्मिती करण्यास या अन्वये खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

१) महामंडळांतर्गतच्या उप अभियंता संवर्गातील ५ पदे समर्पित करुन त्या पदावर महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नियुक्तीकरिता संदर्भाधिन क्र.९ व १० येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२) सदर पदाची वेतनश्रेणी एस-२०, ५६१००-१७७५००/- याप्रमाणे उप अभियंता पदाच्या समकक्ष राहील. त्यामुळे कोणताही वित्तीय भार पडणार नाही.

३) या पदाचे प्रशासकीय नियंत्रक अधिकारी महामंडळाच्या कार्यालयातील कार्यकारी संचालक राहतील.

४) भूसंपादन कक्षासाठी उपजिल्हाधिकारी पदाव्यतिरिक्त सेवानिवृत्त तहसीलदार (१ पद) तसेच सेवानिवृत्त अव्वल कारकून (२ पदे) यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात याव्यात. सदर सेवानिवृत्त तहसीलदार व अव्वल कारकून यांच्या नियुक्तीकरिता संदर्भाधिन क्र.११ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) भूसंपादन कक्षासाठी कनिष्ठ लिपिक (१ पद) व शिपाई (१ पद) यांच्या सेवा महामंडळाने त्यांच्या उपलब्ध मनुष्यबळातून उपलब्ध करुन द्याव्यात.

६) सदर प्रस्तावामुळे करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या पदांव्यतिरिक्त इतर कोणताही वित्तीय भार पडणार नाही.

७) याबाबतचा खर्च महामंडळास अनुज्ञेय असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पुढील प्रमाणे राहतील :-

१. महामंडळामार्फत विविध मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचे लेखे तयार करुन जतन करणे.

२. संपादित झालेल्या सर्व जमिनीच्या “ड” पत्रकातील फेरफार नोंदी अद्ययावत करुन याबाबतचा सविस्तर लेखा-जोखा तयार करुन जतन करणे.

३. महामंडळांतर्गत सुरु असलेल्या विविध प्रकल्पांसाठी यापूर्वी संपादित झालेल्या जमिनींचा हिशोब ठेवून भाडे तत्वावर वा इतर शासकीय विभागांना दिलेल्या जमिनीचे लेखे अद्ययावत करुन जतन करणे.

४. भूसंपादनाशी संबंधित कलम १८ व २८(अ) अंतर्गत भूधारकांनी दिवाणी न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या न्यायप्रविष्ट खटल्यांमध्ये शासनाची बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी सहाय्य करणे.

५. प्रकल्पांसाठी तसेच पुनर्वसनासाठी भूसंपादन करताना विविध संस्थांमध्ये समन्वय साधून सुलभतेने व सहजतेने कार्यवाही करणे.

६. राज्य शासनाने निश्चित केलेल्या, राज्यातील मोठ्या धरणातील गाळ/ वाळू निष्कासित करण्याच्या धोरणाबाबत महामंडळाच्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे.

७. भूसंपादनासंबंधित विविध न्यायालयातील दावे निकाली काढण्याकरिता आयोजित केलेल्या महा लोकअदालतीमध्ये शासनाच्या वतीने तडजोडनामा करण्यास सहाय्य करणे.

८. सद्य:स्थितीत जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील शासकीय विश्रामगृहे, धरणक्षेत्रा नजिकच्या अतिरिक्त जमिनी व रिक्त वसाहती Public Private Partnership (P.P.P) या तत्वावर खाजगी यंत्रणाकडून विकसीत करणे व व्यवस्थापन करणे याबाबतच्या धोरणांसंबंधी महामंडळाच्या निर्देशानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करणे.

९. भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने करावयाचे समन्वय म्हणजेच - आवश्यक संयुक्त मोजणी करुन घेणे, संयुक्त मोजणीतील त्रुटींची पूर्तता, भूसंपादन प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता, निवाडयासाठीची आवश्यक मूल्यांकने करणे.

१०. खाजगी भूसंपादनासाठी भूधारकांशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे प्राप्त करुन घेवून त्याची छाननी करणे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जमीन खरेदीचे दर मंजूर करुन घेणे व जमिनीचा ताबा मिळवणे.

११. प्रकल्पग्रस्तांशी निगडीत बाबींचे निराकरण करुन मार्गी लावणे.

१२. महामंडळाच्या अधिनियमातील प्रकरण ५ (भूमि संपादन) मधील कलम २६, २७ व २८ नुसार करावयाच्या कार्यवाही संबंधात कार्यकारी संचालक यांना अभिप्राय देणे.

१३. महामंडळ कार्यालयातील कार्यकारी संचालक/ अधीक्षक अभियंता नेमून देतील असे व त्यांनी ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार जमिनीशी संबंधित इतर कामकाज पार पाडणे.

३. सर्व महामंडळांतर्गत भूसंपादन कक्षासाठी उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी आवश्यक पदे खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत :-

(१) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे मंडळ, कुवारबांव, रत्नागिरी अधिनस्त जलसंपत्ती सर्वेक्षण व अन्वेषण उपविभाग, देवरुख हे उपविभागीय कार्यालय पुरेसा कार्यभार नसल्याने बंद करुन त्या कार्यालयातील उपअभियंता संवर्गातील १ पद समर्पित करण्यात येत आहे.

(२) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे मंडळ, सातारा अधिनस्त कोयना बांधकाम उपविभाग क्र.२-अ, कोयनानगर हे उपविभागीय कार्यालय पुरेसा कार्यभार नसल्याने बंद करुन त्या कार्यालयातील उपअभियंता संवर्गातील १ पद समर्पित करण्यात येत आहे.

(३) तापी खोरे विकास महामंडळ, जळगांव यांच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे अधिनस्त कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदुरबार अंतर्गतचे नर्मदा

विकास उपविभाग क्र. ४, धडगांव हे उपविभागीय कार्यालय पुरेसा कार्यभार नसल्याने बंद करुन त्या कार्यालयातील उपअभियंता संवर्गातील १ पद समर्पित करण्यात येत आहे.

(४) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखालील मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांच्या अधिनस्त अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांच्या अंतर्गतच्या कार्यकारी अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांच्या अंतर्गतचे जलविद्युत उपविभाग क्र.९, औरंगाबाद हे उपविभागीय कार्यालय बंद करुन या कार्यालयातील उपअभियंताचे १ पद समर्पित करण्यात येत आहे.

(५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गतच्या अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर या मंडळ कार्यालयातील सहायक अधीक्षक अभियंता हे १ पद समर्पित करण्यात येत आहे.

४. उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यास महसूल व वन विभागाने सहमती दर्शविलेली आहे.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र: १०९२/सीआर-८०६/व्यय-६, दि.१५/१०/१९९२ मधील तरतूदींनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०७१०११२११०३५२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2019.07.10 11:33:18 +05'30'

(सु. गं. गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
४) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
५) मा.मंत्री (खारभूमी) यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
७) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा.
८) मा. विधान परिषद / विधानसभा सदस्य (सर्व).
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१५) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर.
१६) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७) सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे.
१८) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा (DTHRS) मेरी, नाशिक.
१९) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
२०) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
२१) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
२२) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
२३) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
२४) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५) मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग, औरंगाबाद
२६) मुख्य अभियंता , जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई.
२७) मुख्य अभियंता (जलसंपदा), जलसंपदा विभाग, पुणे.
२८) मुख्य अभियंता , जलसंपदा विभाग, नागपूर.
२९) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
३०) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद.
३१) अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर.
३२) अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे.
३३) अधीक्षक अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे मंडळ, कुवारबांव, रत्नागिरी.
३४) अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे मंडळ, सातारा.
३५) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
३६) आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३७) उप सचिव (सेवा) / उप सचिव (आस्था)/उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३८) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई.
३९) कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदुरबार.
४०) कार्यकारी अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे विभाग, औरंगाबाद.
४१) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, रत्नागिरी.
४२) कार्यकारी अभियंता, कोयना सिंचन विभाग, कोयनानगर.
४३) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे.
(महामंडळांतर्गत पदांच्या नियंत्रणात होणाऱ्या बदलांची नोंद घेण्यास्तव अग्रेषित)
४४) उप अभियंता, जलविद्युत उपविभाग क्र.९, औरंगाबाद.
४५) उप अभियंता, नर्मदा विकास उपविभाग क्र. ४, धडगांव.
४६) उप अभियंता, जलसंपत्ती सर्वेक्षण व अन्वेषण उपविभाग, देवरुख.
४७) उप अभियंता, कोयना बांधकाम उपविभाग क्र.२-अ, कोयनानगर
४८) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४९) आस्थापना (पुनर्रचना) संग्रहार्थ / निवड नस्ती.